# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ११.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ पोलीसांची कामगीरी :— क्रिप्टो करेन्सी द्वारे फसवणूक करणारा आरोपी अटकेत.**

फिर्यादी रोहीत गणेश जागरे वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. ६३२, श्री डेअरी जवळ, हंसापुरी, नागपूर हे किराणा व्यापारी आहेत. फिर्यादीची ओळख मित्राचे माध्यमातुन सोशल मिडीयाद्वारे आरोपी पोलाब सरकार वय २५ वर्ष रा. मलिकपारा, नरसिंगाबाद रोड, बालाजी रोड, आसनसोल जि. बरधामना, पश्चिम बंगाल, याचेसोबत झाली होती. आरोपीने फिर्यादीस क्रिप्टो करेन्सी बाबत माहिती देऊन खरेदी केल्यास फार मोठया प्रमाणात लाभ होतो असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. दिनांक १५.१०.२०२५ चे १०.०० वा. ते दिनांक ०४.०५.२०२६ चे २१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आरोपीला वेळोवेळी, वेगवेगळया तारखांना, वेगवेगळया रकमा क्रिप्टो करेन्सी खरेदीकरीता आरोपीचे बॅक खात्यावर पाठविल्या. फिर्यादीने एकूण १७,३२,६१२/— रुपये आरोपीचे खात्यावर पाठविले. परंतु आरोपी याने फिर्यादीस कोणतेही क्रिप्टो करेन्सी न पाठविता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे आरोपींविरूध्द कलम ३१६(५),३१८(४) भान्यासं सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी सायबर सेलचे मदतीने तांत्रिक तपास करुन आरोपीचे बॅक खात्याबाबत माहिती प्राप्त करुन त्याचेवर पाळत ठेऊन गुन्हयातील आरोपी नामे पोलाब पार्थ सरकार वय २५ वर्ष रा. मलिक पारा, नरसिंगाबाद रोड, बालाजी रोड, आसनसोल जि. बरधामना, पश्चिम बंगाल याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. आरोपीला गुन्हयात अटक करुन त्याची पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आलेली आहे. आरोपी हा राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय टोळीचा सदस्य असल्याचे दृष्टीकोणातुन गुन्हेशाखा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. अतुल मोहनकर, पोनि सुधीर बोरकुटे, पोउपनि मधुकर काठोके, सफौ. संतोष ठाकूर, पोहवा. विजय श्रीवासे, मनोज नेवारे, विनोद गायकवाड, पोअं. चंद्रशेखर डेकाटे, दीपक दासरवार, जितेश रेड्डी, सहदेव चिखले, विशाल रोकडे, प्रमोद देशभ्रतार व सायबर सेलचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.




**२) वाडी पोलीसांची कामगीरी :— मंदीर चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २३.०६.२०२६ चे २२.०० वा. ते दि. २४.०६.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, सार्वजनिक हनुमान मंदीर, विठ्ठल वाडी, दत्तवाडी येथील हनुमान मंदीरात शिव मंदीर व देवी मंदीर आहे. फिर्यादी फाल्गुन शरद हिंगने वय २५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ११, विठ्ठल वाडी, दत्तवाडी नागपूर हे मंदीर बंद करुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने मंदीराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन मंदीरातील स्टीलचे दानपेटीचे लॉक तोडून, त्यामधील अंदाजे १०,०००/— रुपये चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस वाडी पोलीसांनी तांत्रिक तपास करून, तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद मंदीर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकास अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे बुटीबोरी नागपूर ग्रामिण हद्दीतुन ०२ ठिकाणी व पोलीस ठाणे कटंगी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश येथे चोरी केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन रोख १,२००/—रू., ०१ लोखंडी सब्बल तसेच विनाक्रमांकाची काळया रंगाची बजाज सीटी १०० दुचाकी असा एकुण २६,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणलेले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. ऋषिकेश सिंगा रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, पोउपनि. अमित बंडगर, पोहवा. रोशन फुकट, राहुल बोटरे, सोमेश्वर वरधे, दुर्गादास माकडे, पोअं. विनोद कुंभलकर, स्वप्निल कारंडे व अश्विन चौधरी यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे जुनी कामठी :— समाज माध्यमावर शस्त्रासह व्हिडीयो पोस्ट करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

जुनी कामठी पोलीसांना सोशल मिडीयाद्वारे एक इसम त्याचे हातात घातक शस्त्र उघडपणे सार्वजनिक रस्त्यावर घेऊन वारंवार हवेत फिरवितांना तसेच रोडवर घासतांनाचा व्हिडीयो दिसून आल्याने पोलीसांनी खात्री केली असता, दिनांक १०.०७.२०२६ चे २२.०० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत मोटर स्टॅन्ड मस्जिद जवळ, ज्युस सेंटरसमोर, सार्वजनिक रोडवरील असून आरोपी फहीम शेख उर्फ गोलु वय ३० वर्ष रा. मोटर स्टॅन्ड मस्जिद मागे, कामठी, याचा असल्याचे समजले. आरोपीचे वर्तन हे सार्वजनिक ठिकाणी शांतता

तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचे असून सामान्य नागरिकांचे मनात भिती व असुरक्षिततेचे वातारवण निर्माण करणारे असल्याने आरोपीविरुध्द पोलीस ठाणे जुनी कामठी येथे कलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :—** दिनांक ११.०७.२०२६ चे १२.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत सुखमनि प्रोव्हिजन, जनरल स्टोअर्स समोर, गोदावरी भवन, क्वेटा कॉलनी येथे एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ५५ वर्ष वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी भगवान जेठानंद नथवानी वय ७४ वर्ष, रा. प्लॉट क्र. १५१, क्वेटा कॉलनी, लकडगंज, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सागर शिंदे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक १०.०७.२०२६ चे ०५.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत जबलपूर—अमरावती रोड, रसरंजन ढाब्यासमोर, ए.के. शिवहरे कंस्ट्रक्शन साईटवर, हिंगणा येथे मजुर नामे मोहम्मद मसाऊद मोहम्मद रिझवान वय ३८ वर्ष रा. ग्राम पोस्ट चोरली ता. बेलदोर जि. खगडीया, बिहार ह.मु. गुमगाव, नागपूर हा काम करीत असता, लोखंडाचा तीन टन वजनी गोळयासह खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. चंचल पवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर:—** पंचम धोंडू मरसकोल्हे वय ७० वर्षे, रा. रमाई नगर, बुध्दविहाराजवळ, सैनीचे घरी किरायाने, कपीलनगर, नागपूर हे दिनांक २२.०६.२०२६ चे १४.३० वा. पासून पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** —रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— शर्ट व फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—कपाळावर जखमेचे लहान चिन्ह आहे.

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :—** अर्जुन दशरथ करोसिया वय २३ वर्षे, रा. गांधी नगर, कामठी, नागपूर हे दिनांक ०९.०७.२०२६ चे १७.०० वा. पासून पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** —रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे, अंगात— निळा टिशर्ट व करडया रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—उजवे पायाचे घोटयाजवळ जुने माराचे निशान आहे.



पंचम



अर्जुन

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधीश –१७ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | २२/२००६ | कलम ३५३, ३३२,२९४ भा.दं.वि. | गिरीधर नारायणराव राव वय ४८ वर्ष रा. रेल्वे स्टेशन इतवारी, गेट किपर, नागपुर | २२.०७.२०२६ |
| २. | मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३०००५८ /२०१२ | कलम ३२३, २९४,५०६ ब भा.दं.वि. | १) अजय मधुकर निनावे रा. सुभाष पुतळा.सतरंजीपुरा, मुन्ना दराडेचे घराजवळ, नागपूर.<br>२) सादीक अली मुकद्दर अली रा. आदमशहा चौक, मोठया मस्जिदजवळ, लकडगंज, नागपूर | २९.०७.२०२६ |
| ३. | मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३००६०७ /२०१४ | कलम ४९८ अ, ३२३ भा.दं.वि. | अतुल विश्वनाथ खोब्रागडे वय ३० वर्ष रा. प्लॉट क्र. ९४, इंद्र नगर, नरसाळा रोड, हुडकेश्वर, नागपूर. | १६.०७.२०२६ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १२, नागपुर. | ३०२७२३ /२०१४ | कलम ३५४,५०६ भा.दं.वि. | राहुल शामसुंदर विश्वकर्मा रा. अशोक चौक, गजानन मंदीरजवळ, ग्रेट नाग रोड, नागपूर. | २७.०७.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**वाहतुक शाखा प्रेसनोट**

अ) वाहतूक परिमंडळ एम.आय.डी.सी. हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमिटेड कडुन लोकमान्य नगर ते हिंगणा गावापर्यत महाराष्ट्र मेट्रो रेलची उभारणी करणार आहे. सदर कामा दरम्यान झोन चौक ते आय सी. चौक पर्यत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**इंडियन ऑयल पेट्रोल पंप ते झोन चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- हिंगणा कडून नागपूर कडे जाणारी वाहतूक हि इंडियन ऑयल पेट्रोल पंप कडुन सर्व्हीस रोडने झोन चौक पर्यत जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक १२.०७.२०२६ ते ०९.०८.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**ब)** वाहतूक परिमंडळ सिताबर्डी हद्दीत जे.पी. इंन्टरप्राईजेस तर्फे अजनी ओव्हरब्रिज चौक येथे ८० मीटर लांबीचा अंडरपासचे (बॉक्स सेल) बांधकाम करण्यात ९० दिवसात दिवस/रात्री करण्यात येणार आहे. त्या करीता वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत अधिसुचना काढणे आवश्यक आहे. म्हणुन माझी अशी खात्री झाली आहे की, वाहतूकीस अडथळा निर्माण होवू नये, वाहतूक सूरळीत राहावी, व वाहन चालकांची गैरसोय होवू नयत्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- अजनी मेट्रो स्टेशनकडुन येणारी हलके वाहन हे सरळ चुनाभट्टी कडे जातील, तसेच वाहने डावेवळण घेवुन टि.बी वार्ड मेडिकल चौकाकडे जातील.
- चुनाभट्टी कडुन येणारे हल्के वाहतूक ही सरळ अजनी मेट्रो स्टेशन कडे जातील.
- कृपलानी चौकाकडुन येणारी व धंतोली अंडरब्रिज मार्गे जाणारी वाहतूक कृपलानी चौक पासुन १०० मीटर अंतरावर मेट्रो रोड वरून डावे वळण घेवुन पुढे अजनी मेट्रो स्टेशन कडे जातील, तेथे डार्व्हशनचे बोर्ड लावण्यात येणार आहे.
- टि.बी वार्ड मेडीकल चौकाकडुन अजनी ओव्हरब्रिज चौक मार्गे कृपलानी चौकाकडे जाणारी वाहतूक ही डावे वळण घेवुन जलप्रदाय कार्यालय समोरून यु टर्न घेवुन कृपलानी चौक किंवा काग्रेस नगर चौकाकडे जातील.
- पोलीस ठाणे धंतोली कडुन काग्रेस नगर चौक मार्गे अजनी ओव्हर ब्रिजकडे जाणारी जड वाहतूक, बसेस ही काग्रेस नगर चौकातुन उजवे वळण घेवुन रहाटे चौक मार्गे जातील. काग्रेस नगर चौकात डार्व्हशनचे बोर्ड लावतील.
- अजनी चौकातुन अजनी ओव्हरब्रिज मार्गे पुढे जाणारी जड वाहतूक व बसेस ही अजनी चौकातुन सरळ कृपलानी चौक, रहाटे कॉलोनी चौकातुन उजवे वळण घेवुन कॉग्रेस नगर चौक मार्गे जातील. अजनी चौकात डार्व्हशनचे बोर्ड लावतील.
- कृपलानी चौकातुन अजनी ओव्हरब्रिज मार्गे मेडीकल हॉस्पीटल किंवा पोलीस ठाणे अजनी कडे जाणारी वाहतूक ही कृपलानी चौक पासुन १०० मीटर अंतरावर मेट्रो रोड वरून डावे वळण घेवुन अजनी मेट्रो स्टेशन, कॉग्रेस नगर चौकातुन यु टर्न घेवुन जातील. कृपलानी चौकात डायर्व्हशनचे बोर्ड लावतील.

**सदरची अधिसूचना दिनांक १३.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे** )

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर